# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.08.2024** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय लाभ वितरणाचा, पुण्यात नेत्रदीपक सोहोळ्यात शुभारंभ

२. डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात उपाययोजना सुचवण्यासाठी समिती स्थापन करण्याचं केंद्राचं आश्वासन, लाक्षणिक संपात देशभरातील डॉक्टरांचा सहभाग

३. राज्यात कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा राखण्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आवाहन आणि

४. जमीन सुधारणा ही काळाची गरज असल्याचं विवेक देबरॉय यांचं प्रतिपादन

**मुख्यमंत्री- लाडकी बहीण**

महिला लखपती झालेल्या बघण्याची, आणि त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याची शासनाची इच्छा असून, महिलांच्या विकासाच्या योजना राबवण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात दिली. राज्य सरकारच्या "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेच्या, राज्यस्तरीय लाभ वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेतून मिळणाऱ्या पैशांतून कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याबरोबरच लाभार्थी महिलांना आर्थिक उन्नती साधता येईल असं मुख्यमंत्री म्हणाले. कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. या योजनेसाठी मार्च 2025 पर्यंतची तरतूद केली असून, पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असं उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले. तर यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं. राज्यातल्या अनेक जिल्ह्यातल्या महिला, दूरस्थ माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या . यंदाची रक्षाबंधनाची ओवाळणी कायम स्मरणात राहणार असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

या योजनेच्या पुण्यातील भोसरी इथल्या लाभार्थी रोहिणी घुणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**नाशिक नंदूरबार**
राज्यात विविध ठिकाणी या योजनेच्या शुभारंभाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. सर्वांना स्वावलंबी आणि समृद्ध करण्यासाठी शासनाच्या योजनांची आखणी होत असल्याचं आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांनी नंदुरबारमधल्या कार्यक्रमांत बोलताना सांगितलं. या योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात 7,20,844 अर्ज मंजुर झाले आहेत. लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीत नाशिक जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती मंत्री दादा भुसे यांनी नाशिकमधल्या कार्यक्रमात दिली.

**संमेलन**
दिल्लीत साहित्य संमेलनाचं आयोजन ही मराठी भाषिकांसाठी अभिमानास्पद बाब असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पुण्यात सांगितलं. सरहद संस्थेद्वारे आयोजित 98 व्या मराठी साहित्य संमेलनाचा मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत कार्यारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील मराठी भाषा अध्यासन आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासनही शिंदे यांनी दिलं.

**पुरस्कार**
महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे 2022-23 या वर्षीचे ,कृषी आणि अकृषी विद्यापीठांचे राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले. यामध्ये राहुरी इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापिठचे संचालक, प्राध्यापक डॉक्टर महावीरसिंग चौहान यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक म्हणून तसंच महात्मा फुले कृषी विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे.

**डॉक्टर**
कोलकाता इथं महिला डॉक्टरवरील अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ भारतीय वैद्यकीय संघटनेनं काल 24 तासांचं काम बंद आंदोलन पुकारलं होतं. या आंदोलनात राज्यातील शासकीय तसंच खासगी क्षेत्रातील डॉक्टर्स सहभागी झाले होते. काही सामाजिक संघटनांच्या महिला पदाधिकाऱ्यांनीही या मोर्चात सहभाग नोंदवून त्वरित न्याय देण्याची मागणी केली. निमा, मार्ड, आय एम ई आय आदी संघटनांचा या मोर्चात सहभाग होता.

**समिती**
डॉक्टरांच्या सुरक्षेसंदर्भात करायच्या उपाययोजना सुचवण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचं आश्वासन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं दिलं आहे. डॉक्टरांच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी काल

नवी दिल्लीत आरोग्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यावेळी अधिकाऱ्यांनी हे आश्वासन दिलं. या समितीमध्ये डॉक्टरांचे आणि राज्य सरकारांचे प्रतिनिधी असतील. डॉक्टरांवर होणारे हल्ले रोखण्यासाठी 26 राज्यात कायदे मंजूर झालेले आहेत. दरम्यान, राज्यासह देशात डॉक्टरांच्या सुरु असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केंद्रीय सार्वजनिक आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय स्तरावर एक कडक कायदा तयार करण्यात यावा, या अनुषंगाने यावेळी चर्चा झाली. यासंदर्भात सकारात्मक विचार करावा, असं शिंदे यांनी यावेळी सांगितलं. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात लेखापरीक्षण केलं जाईल, वैद्यकीय कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण मिळेल, तसेच हिंसाचाराच्या घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतील. आरोग्य सेवा संरक्षण कायद्यासंदर्भात राज्य सरकार केंद्राकडे विनंती करेल, असं आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी मार्ड च्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकत्याच झालेल्या चर्चेदरम्यान दिलं होतं.

**मंकी पॉक्स**

देशात आतापर्यंत मंकी पॉक्स या आजाराचा एकही रुग्ण आढळून आला नसल्याचं केंद्रिय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांनी काल नवी दिल्लीत  सांगितलं. या संदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. जागतिक आरोग्य संघटनेनं काही दिवसांपूर्वी मंकी पॉक्स या आजारा संदर्भात आरोग्य विषयक आणीबाणी जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर देशातील स्थितीचा आढावा घेण्यात आला.

**नाशिक-दंगल**

बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ, शुक्रवारी नाशिकमध्ये झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागलं होतं. पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यानं परिस्थती वेळेत आटोक्यात आली. काल या भागातील जनजीवन पुन्हा पूर्वपदावर आलं आहे. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून काही भागात दंगल नियंत्रण पथकाबरोबरच ,राज्य राखीव दलाचा बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी सहा गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून, आतापर्यंत एकंदर 20 जणांना अटक करण्यात आली आहे. तर  दंगल घडवून आणणाऱ्या 40 जणांचा पोलिसांच्या विविध पथकांकडून शोध सुरू आहे. दरम्यान, काल नाशिकमधील परिस्थितीबाबत पालकमंत्री दादा भुसे यांनी आढावा घेतला.

**मुख्यमंत्री-आवाहन**

नाशिक शहरातील काही भागांमध्ये काल निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित राखण्यासाठी सर्व नागरिकांना दक्षता घेण्याचं आवाहन केलं आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांच्या तत्पर

कारवाई मुळं परिस्थिती आटोक्यात आली असली तरी अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी सर्वांनी जागरूक राहण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.

**देबरॉय**

बहुतांश भ्रष्टाचार हा शेतजमिनीला , बिगर शेतजमीन घोषित करण्यात होत असल्याने जमीन सुधारणा ही काळाची गरज आहे, असं प्रतिपादन गोखले राज्य शास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलपती विवेक देबरॉय यांनी काल पुण्यात केलं. 'भारतातील आर्थिक सुधारणा' या विषयावर विशेष व्याख्यान देताना ते बोलत होते. पायाभूत सुविधांवर वाढीव खर्च करावा अशी मागणी केली जाते. तथापि एकंदर जमा होणारा कर केवळ 15 टक्केच आहे. त्यामुळं एकतर मागण्या कमी कराव्या लागतील किंवा जास्त कर भरावा लागेल. त्याशिवाय आर्थिक अंदाजपत्रकात मोठ्या प्रमाणात सवलती दिल्या जातात हेही लक्षात घेतलं पाहिजे असं देबरॉय यांनी नमूद केलं. यावेळी गोखले संस्था आणि भांडारकर प्राच्य विद्या संस्था यांच्यादरम्यान एक सामंजस्य करार करण्यात आला.

**पंढरपूर-दर्शन**

पंढरपूर मधल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील भाविकांसाठी मंडप आणि स्काय वॉक च्या माध्यमातून सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी या उद्देशांना 110 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला. या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिव सुनीता सौ निक यांच्या अध्यक्षतेखाली उच्च अधिकार समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**राखी**

उद्याच्या रक्षाबंधनाच्या सणा निमित्त नागपूरातील ललिता पब्लिक शाळेतील  विद्यार्थ्यांनी, 22 फूट लांबी रुंदीची पर्यावरणपूरक राखी साकारली आहे. एक पेडं मा के नाम, पर्यावरण वाचवा असे सामाजिक संदेश या भव्य राखी उपक्रमातून साकारले आहेत.

**पाऊस**

बीड जिल्ह्यातील पाटोदा भागात शुक्रवारी अतिवृष्टीची नोंद झाली. मांजरा नदीकाठची शेकडो एकर पिकं या पावसानं पाण्याखाली गेली आहेत. पाटोदा, पारगाव, अनपटवाडी या नदीकाठच्या गावांना या पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. पावसामुळे विद्युत पुरवठाही खंडित झाला आहे. इंटरनेट सेवा कालपर्यंत बंद होती.

**पाऊस**

सातारा शहरासह जिल्ह्यातील विविध भागात काल वारे आणि विजांसह जोरदार पावसानं हजेरी लावली. पुणे आणि परिसरातही काल रात्रीपासून पावसाची संततधार सुरू आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराच्या वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.